ePaper
| वर्ष - 8 | अंक - 360 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज™
www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 8 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## संघर्ष पेटणार? भास्कर जाधव यांची कदमांच्या विरोधात मोठी घोषणा



**आतील पानांत**
- मुंबईने घडवले, हे विसरू नकोस!
- सिराजबाबत खबरदारी गरजेची!
- TRP चा उच्चांक, सगळे रेकॉर्ड मोडले!
- शेतकऱ्यांच्या हिताशी तडजोड नाही!

**अश्लिलतेचा कळस** महिला आयोगाने पुराव्यानिशी खेवलकरचा 'व्हाईट कॉलर' बुरखा फाडला!

# खडसेंचा जावई लिंगपिसाटच!

### निष्पाप असल्याचे खोटे ढोंग सुरू, मोबाईलमध्ये मुलींचे २५२ अश्लील व्हीडिओ आणि १४९७

| पुणे / मुंबई |
प्रतिनिधी | महाईन्यूज

**मालेगावमध्ये झालेल्या बॉम्बस्फोट खटल्याचा निकाल तब्बल १७ वर्षांनी देण्यात आला. या प्रकरणातील सर्व सात आरोपींची निर्दोष मुक्तता झाली असून काँग्रेसच्या नेत्यांनी मांडलेला 'भगव्या दहशतवादा' चा मुद्दा खोटा ठरला असून त्याच्या बागुलबुवाचा फुगा फुटला आहे. 'फेक नॅरेटिव्ह' चालविल्याबद्दल काँग्रेसच्या नेत्यांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.**



राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार, ज्येष्ठ राजकीय नेते एकनाथ खडसे यांचा जावई प्रांजल खेवलकर रेव्ह पार्टीत अटक झाल्यानंतर त्याचे खरे रूप पुढे येत आहे. खेवलकर हा लिंगपिसाट असल्याचे हळूहळू स्पष्ट होत असून त्याने पांगरलेला 'व्हाईट कॉलर' चा बुरखा टराटरा फाटत आहे.

### महिलांची तस्करी सुद्धा ?

पुण्यातील खराडी येथील रेव्ह पार्टी प्रकरणी माजी मंत्री एकनाथ खडसे यांच्या जावयाला पोलिसांनी अटक केली होती. सध्या ते तुरुंगात आहेत. या रेव्ह पार्टीत पोलिसांनी गांजासदृश पदार्थ, दारुच्या अनेक बाटल्या जप्त केल्या होत्या. या प्रकरणात आता राज्य महिला आयोगानेही उडी घेतली आहे. या प्रकरणाचा महिलांची तस्करी या दृष्टीनेही तपास करावा, अशी मागणी महिला आयोगाने पोलिसांकडे केली आहे.

### मोबाईलमध्ये नंगानाच !

महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी याबाबत अनेक महत्त्वाची माहिती दिली. खेवलकर यांच्या मोबाईलमध्ये अक्षरशः हैदोस आणि नंगानाच आढळून आला आहे. यामध्ये मुलींचे २५२ अश्लील व्हीडिओ तसेच १४९७ आक्षेपार्ह आणि उघडे नागडे फोटो आढळून आले आहेत.

## मुली खरेदी विक्रीचा मोठा व्यापार?

एकनाथ खडसे यांच्या या लिंगपिसाट जावयाचा खरा चेहरा उघडकीस आला तो त्याच्या मोबाईलमुळे! त्यातील काही मजकूर फोटो आणि व्हीडिओ मुळे एक गोष्ट लक्षात आली आहे ती म्हणजे या खेवलकरचा मुलींची खरेदी विक्री करण्याचा व्यापार होता की काय अशी शंका आली आहे. वेगवेगळ्या शहरांमध्ये त्याने अशा मुली 'पेरल्या' होत्या आणि त्यांच्याशी स्वतः संबंध ठेवून तो इतरांना पुरवण्याचा उद्योगही करत असावा, अशी शंका आहे. अशा दिवट्या जावयामुळे एकनाथ खडसे मात्र चांगलेच अडचणीत आले आहेत.

### काय म्हणाल्या चाकणकर..

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी थेट पत्रकार परिषद घेऊन एकनाथ खडसे यांच्या जावयावर गंभीर स्वरुपाचे आरोप केले आहेत. खेवलकरांच्या मोबाईलमध्ये महिलांचे आक्षेपार्ह फोटो आहेत, असा सर्वात खळबळजनक दावा चाकणकर यांनी केला आहे. पुण्यातील रेव्ह पार्टी प्रकरणात प्रांजल खेवलकर, निखील पोपटाणी, समीर फकीर मोहम्मद सय्यद, सचिन भोबे, श्रीपाद मोहन यादव तसेच त्यांच्यासोबत असलेल्या दोन महिला यांना पुण्यात अटक करण्यात आली होती. त्याचप्रमाणे, पार्टीच्या ठिकाणाहून ४१ लाख ३५ हजार किमतीचे कोकेन, गांजा, दहा मोबाईल, हुक्का पॉट, दारुच्या अनेक बाटल्या तसेच इतर अमली पदार्थ जप्त करण्यात आले होते, अशी माहिती चाकणकर यांनी दिली.

### महिलांचे नग्न, अर्धनग्न फोटो..

प्रांजल खेवलकर यांच्या पुण्यातील हडपसर येथील घरातून एक मोबाईल जप्त करण्यात आला होता. या मोबाईलचे सायबर तज्ज्ञांच्या मदतीने तांत्रिक विश्लेषण करण्यात आले आहे. या मोबाईलच्या हिडन फोल्डरमध्ये महिलांसोबतच्या चॅटिंगचे स्क्रीनशॉट, पार्टीचे फोटो, व्हीडिओ तसेच महिलांचे नग्न आणि अर्धनग्न फोटो, अशोभनीय कृत्यांचे व्हीडिओ हाती लागले आहेत, अशी खळबळजनक माहिती रुपाली चाकणकर यांनी दिली.

### मुलींना लोणावळा येथेही बोलावले..

या मोबाईलमध्ये व्हॉट्सऍप चॅटमध्ये एकूण सात मुली आढळून आल्या. या मुलींची नावे आरूष या नावाने सेव्ह करण्यात आली होती. प्रत्यक्षात, आरुष नावाची व्यक्ती महिलांची तस्करी करत होती, असे आढळून आले आहे. आरुष याने या मुलींना पार्टीकरिता लोणावळा आणि पुणे येथे बोलवल्याचे लक्षात आले. पोलिसांनी छापा टाकला त्याच्या दोन दिवस अगोदर त्याच हॉटेलमध्ये पहाटे चार वाजेपर्यंत दारू आणि हुक्का पार्टी चालू होती. त्यावेळीही वेगळ्या मुली बोलवण्यात आल्या होत्या, असाही दावा रुपाली चाकणकर यांनी केला आहे.

### मुलींचा वापर करणारा नराधम

चित्रपटांत संधी देण्याच्या निमित्ताने मुलींचा वापर करण्यात येत होता. तसेच प्रांजल खेवलकर यांच्या मोबाईलमध्ये आपत्तीजनक चॅटिंग आढळून आली आहे. या चॅटिंगमध्ये चित्रपटांत शूटिंग करण्याच्या निमित्ताने संपर्क साधण्यात आला आहे. चित्रपटात संधी देतो, असे सांगून त्यांना चक्क वापरण्यात आले. तसेच त्यांचे खर्चाचेही पैसे दिले नसल्याचे या चॅटिंगमध्ये दिसून आले, असेही त्यांनी सांगितले आहे.

### मुलींना नशा देऊन जबरदस्ती

खेवलकर यांच्या मोबाईलमध्ये मुलींना नशा देऊन लैंगिक अत्याचार करून व्हीडिओ काढलेले आहेत. या व्हीडिओचा वापर मुलींना परत ब्लॅकमेल करण्यासाठी करण्यात येत होता, असेही गंभीर आरोप रुपाली चाकणकर यांनी केले आहेत. एकनाथ खडसे यांनी मात्र हे आरोप फेटाळले आहेत.

**गुन्हा दाखल**

### गोंधळ घालणाऱ्या घटनेचे पडसाद महापालिकेत उमटले

# पुणे महापालिकेचे अधिकारी आक्रमक!

## राजकीय पदाधिकाऱ्यांना सुनावले

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या बैठकीत जाऊन गोंधळ घालणाऱ्या घटनेचे पडसाद गुरुवारी महापालिकेत उमटले. या घटनेचा निषेध करण्यासाठी महापालिकेतील कर्मचारी, अधिकारी संघटनांनी एकत्र येत या प्रकाराचा निषेध करत महापालिकेत येऊन अधिकाऱ्यांवर दबाव टाकणाऱ्या राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांना कडक शब्दांत सुनावले. 'आपण जनतेचे मालक आहोत, असा समज झालेली 'पिलावळ' तयार झाली आहे. वेळीच तुमच्या वागणुकीत सुधारणा करा, अन्यथा सुज्ञ पुणेकर तुमची जागा दाखवतील' असा इशारा महापालिकेतील अधिकाऱ्यांनी दिला.**



महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन देण्यासाठी आलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी नगरसेवक किशोर शिंदे आणि पदाधिकाऱ्यांनी बुधवारी महापालिका आयुक्त कार्यालयात गोंधळ घातला. मनसे पदाधिकारी महापालिका आयुक्तांच्या अंगावर धावून गेल्याने त्यांच्या विरोधात पोलिसात तक्रार नोंदवून गुन्हा दाखल करण्यात आला. महापालिकेत झालेल्या या घटनेचा निषेध महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी संघटनांच्या वतीने काळ्या फिती लावून आंदोलन करण्यात आले. महापालिकेच्या हिरवळीवर झालेल्या या आंदोलनामध्ये अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., शहर अभियंता प्रशांत वाघमारे, उपायुक्त माधव जगताप, पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख तसेच कर्मचारी संघटनेच्या मुक्ता मनोहर यांच्यासह इतर पदाधिकारी सहभागी झाले होते.

महापालिकेत आंदोलन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी यावेळी करत यापुढील काळात असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशारा देण्यात आला. शहर अभियंता प्रशांत वाघमारे म्हणाले, 'आपण मालक आहोत, असा समज झालेली 'पिलावळ' तयार झाली आहे. महापालिकेचे कोणी मालक नाही, जनता हीच खरी मालक आहे. पुणेकर सुज्ञ आहेत. तेच तुम्हाला जागा दाखवतील. तुम्ही वेळीच वागणूक सुधारा, असा आमचा या पिलावळीला निर्वाणीचा इशारा आहे.'महापालिकेत कोणीही यावे आणि अधिकाऱ्यांना काहीही बोलावे, अशी मानसिकता तयार होणे चुकीचे आहे. अधिकारी त्यांच्या घरचे नव्हे तर शहराचे काम करतात. आयुक्त हे शांत आहेत. पण असे प्रकार घडल्यास आम्ही 'अरेरावीला अरेरावीनेच उत्तर देऊ', असा इशारा परिमंडळ १ चे उपायुक्त माधव जगताप यांनी दिला. पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर म्हणाले, 'शांतपणे निवेदन देऊन चर्चा करून मुद्दे मांडता येतात. पण निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तमाशा करणे अत्यंत अयोग्य आहे. असे प्रकार अनेकदा घडले आहेत. अधिकारी शहराच्या विकासासाठीच काम करतात. त्यांच्यामुळेच पुणे चांगले शहर बनले आहे. लोकप्रतिनिधींसाठी आचारसंहिता असलीच पाहिजे. चुकीच्या कामासाठी अधिकाऱ्यांवर दबाव आल्यास त्याला विरोध केला पाहिजे.'महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन देण्यासाठी आलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी नगरसेवक किशोर शिंदे आणि पदाधिकाऱ्यांनी बुधवारी महापालिका आयुक्त कार्यालयात गोंधळ घातला. मनसे पदाधिकारी महापालिका आयुक्तांच्या अंगावर धावून गेल्याने लावून आंदोलन करण्यात आले. विविध विभागांचे प्रमुख तसेच कर्मचारी संघटनेच्या मुक्ता मनोहर यांच्यासह इतर पदाधिकारी सहभागी झाले होते. महापालिकेत आंदोलन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी यावेळी करत यापुढील काळात असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशारा देण्यात आला.

### अरेरावीला अरेरावीनेच उत्तर देऊ

शहर अभियंता प्रशांत वाघमारे म्हणाले,'आपण मालक आहोत, असा समज झालेली 'पिलावळ' तयार झाली आहे. महापालिकेचे कोणी मालक नाही, जनता हीच खरी मालक आहे. पुणेकर सुज्ञ आहेत. तेच तुम्हाला जागा दाखवतील. तुम्ही वेळीच वागणूक सुधारा, असा आमचा या पिलावळीला निर्वाणीचा इशारा आहे.'महापालिकेत कोणीही यावे आणि अधिकाऱ्यांना काहीही बोलावे

# 'मनसे'साठी महाविकास आघाडी मैदानात

## पालिका भवनासमोर आंदोलन; नवीन राजकीय समीकरणाची चर्चा

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका आयुक्तांच्या कार्यालयात आयुक्त आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) पदाधिकारी यांच्यात झालेल्या वादानंतर महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), काँग्रेस आणि शिवसेना (ठाकरे) पक्ष मनसेच्या समर्थनार्थ मैदानात उतरला. मनसेसोबत महाविकास आघाडीने महापालिकेच्या प्रवेशद्वाराजवळ आंदोलन केले.**




यामुळे पुण्यात आगामी काळात मनसे ही महाविकास आघाडीत सहभागी होऊन नवीन राजकीय समीकरण जुळणार का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे.

महाविकास आघाडीतील शिवसेना (ठाकरे) पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांची युती होण्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. राज्यात हिंदी सक्ती करण्याच्या निर्णयाला विरोध करत शिवसेना आणि मनसे यांच्यात दिलजमाई होणार असल्याचे बोलले जाते. शिवसेना (ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही याबाबत सकारात्मक असल्याची भूमिका मांडली आहे. या पार्श्वभूमीवर आंदोलनात मनसेबरोबर महाविकास आघाडी सहभागी झाल्याने राजकीय वर्तुळात वेगवेगळे तर्कवितर्क सुरू झाले आहेत.

मनसेचे माजी नगरसेवक किशोर शिंदे हे बुधवारी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यासाठी महापालिकेत गेले होते. त्या वेळी आयुक्त बैठकीत असल्याने शिंदे यांनी थेट त्यांच्या बैठकीत प्रवेश केला. किशोर राम आणि शिंदे यांच्यात वादावादी झाली. त्यातच आयुक्तांनी 'बाहेर जा' असे हिंदीमध्ये सांगितल्याने या प्रकरणाला वेगळाच रंग आला.

### पालिकेच्या प्रवेशद्वाराजवळ आंदोलन

मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी महापालिकेत ठिय्या आंदोलन करत निदर्शने केली. त्यानंतर तोडगा न निघाल्याने पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेत त्यांच्या विरोधात पोलिसांत गुन्हा दाखल केला. या प्रकरणानंतर महाविकास आघाडीने मनसेच्या समर्थनार्थ मैदानात उतरत महापालिका प्रशासन आणि महापालिका आयुक्तांच्या विरोधात महापालिकेच्या प्रवेशद्वाराजवळ आंदोलन केले.

## आयुक्तांनी निवेदन न स्वीकारल्यामुळे विधानसभा उपसभापतींचे पालिकेच्या पायऱ्यांवर ठाण

# डीपी प्लॅन विरोधात राष्ट्रवादीचा मोर्चा!

### मोर्चाचे निवेदन राष्ट्रवादी आता मुख्यमंत्र्यांना देणार; आयुक्तांच्या कारभाराची चौकशी करण्याची मागणी

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेने नुकताच शहरासाठी सुधारित प्रारुप विकास आराखडा सादर केला आहे. या आराखड्या विरोधात तब्बल पन्नास हजार हरकती नागरिकांनी घेतल्या आहेत. या आराखड्यातील गंभीर त्रुटी, अनियमतता आणि जनविरोधी धोरणांविरोधात आवाज उठविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने महापालिकेवर महामोर्चा काढण्यात आला.**



या विरोधातील निवेदन स्वीकारण्यासाठी आयुक्त शेखर सिंह पालिका प्रशासकीय इमारतीत उपस्थित नसल्यामुळे विधानसभा व सभापतींना पालिकेच्या पायऱ्यांवर बसावे लागले. दरम्यान शिष्टमंडळ आयुक्तांना निवेदन देणारा आहेत हे माहीत असताना सुद्धा आयुक्त जाणीवपूर्वक अनुपस्थित राहिले. त्यांच्या या वागणुकीबद्दल थेट मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे चौकशीची मागणी करणार आहे. आणि डीपी प्लॅन विरोधातील निवेदन आता मुख्यमंत्र्यांकडेच देणार असल्याचे विधानसभा उपसभापती अण्णा बनसोडे यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रारूप सुधारित विकास आराखड्यातील जनविरोधी आरक्षणांविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तर्फे गुरुवारी शहरात जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. शगुन चौक, पिंपरी येथून सुरू झालेला हा मोर्चा जोरदार घोषणाबाजी करत पुणे-मुंबई महामार्गावरून मार्गक्रमण करत महापालिका मुख्यालयावर धडकला. या आंदोलनात विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल, महिला शहराध्यक्षा कविता आल्हाट, माजी आमदार विलास लांडे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेवक अजित गव्हाणे, माजी उपमहापौर डब्बू आसवाणी यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन देण्यासाठी राष्ट्रवादीचे शिष्टमंडळ मुख्यालयात गेले.

पण, आयुक्त हे विभागीय आयुक्तांची बैठक असल्याचे कारण देवून निघून गेले होते. त्यावेळी अतिरिक्त आयुक्त देखील तिथे उपस्थितीत नव्हते. त्यामुळे राष्ट्रवादीकडून निवेदन न देता प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन करण्यास सुरुवात केली.

यावेळी उपसभापती आण्णा बनसोडे म्हणाले की, महानगरपालिकेत आम्ही निवेदन देण्यास आलोय, तर आयुक्त थांबले नाहीत, हे चुकीचं आहे. पण त्यांना माहित नाही राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड शहराचा विकास केला आहे. शहराचा नव्याने विकास आराखडा तयार करण्याचं काम, गेली दोन महिन्यापासून सुरू आहे. त्या विकास आराखड्यामध्ये चुकीची आरक्षणे टाकलेले आहेत. 50 हजार हरकती आल्या होत्या. त्या सर्वांचा रोष धरूनच आज जन आक्रोश मोर्चा आयोजित केला.

आज या ठिकाणी पक्षाचे सर्व पदाधिकारी प्रमुख नगरसेवक अध्यक्ष सर्वजण आले होते, आमच्या सर्वांचा आयुक्त शेखर सिंह यांनी अपमान केला आहे. त्यामुळे आजचे हे निवेदन त्यांना न देता हेच निवेदन राज्याचे मुख्यमंत्री त्यांच्या स्वाधीन करणार आहे. आज या ठिकाणी जितके शिष्टमंडळ उपस्थित आहे. हेच शिष्टमंडळ उद्या जाऊन मुख्यमंत्र्यांनी निवेदन देतील, असेही बनसोडे यांनी सांगितले.

शहराध्यक्ष योगेश बहल म्हणाले की, सध्याचा डीपी प्लॅन चुकीच्या पद्धतीने बनवण्यात आला आहे. त्यात बेकायदेशीर आरक्षणे असून, विकासाच्या नावाखाली नागरिकांच्या भावना पायदळी तुडवल्या जात आहेत. भीमसृष्टी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात पोलीस स्टेशन व बस टर्मिनससाठी ठेवलेले आरक्षण तत्काळ मागे घ्यावे, अशी ठाम मागणी त्यांनी केली. त्यांनी संपूर्ण डीपी व टीपी आराखडा रद्द करून नव्याने, जनतेशी सल्लामसलत करून आराखडा तयार करण्याचे आवाहन केले.

> “ राज्य निवडणूक आयोग, सफाई आयोगाचे पदाधिकारी पुण्यात उपस्थित होते. या संदर्भातील प्रश्नसंदर्भात बैठकीला उपस्थित राहणे आवश्यक होते. त्या बैठकीला मी गेलो होतो. राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाची बैठक महापालिकेत होती. त्या बैठकीत अतिरिक्त आयुक्त उपस्थित होते.
> **-शेखर सिंह,** आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

# गणेश मूर्ती विसर्जनासाठी यंदा हौदांची संख्या वाढवणार

## आयुक्त शेखर सिंह: सर्व विभागांना समन्वयाने काम करण्याच्या सूचना

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**यंदाच्या गणेशोत्सवात मूर्ती विसर्जनाच्या व्यवस्थेचा दर्जा वाढवण्यासाठी महापालिकेने कृत्रिम हौदांची संख्या १६ वरून ३२ वर नेण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. शाडू मातीच्या मूर्तींसाठी विशेषतः १६ नवीन कृत्रिम हौद उभारले जाणार असून पीओपी मूर्तींसाठी स्वतंत्र हौदांची व्यवस्था केली जाणार आहे. यामुळे मूर्तींचे योग्य वर्गीकरण, पर्यावरणपूरक विसर्जन आणि सुलभ व्यवस्थापन शक्य होईल. अशी माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.**




आगामी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सार्वजनिक गणेश मंडळे, स्वयंसेवी संस्था, पर्यावरण प्रेमी यासह नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेली बैठक आयुक्त सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झाली. महापालिका अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता अनिल भालसाकळे, माणिक चव्हाण, उपायुक्त सचिन पवार, अण्णा बोदडे, सहायक आयुक्त निवेदिता घार्गे, किशोर ननवरे, अश्विनी गायकवाड, अमित पंडित, अजिंक्य येळे, क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे, तसेच विविध मंडळाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

आयुक्त सिंह यांनी बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन करताना महापालिकेच्या पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती दिली. यंदाच्या गणेशोत्सवात मूर्ती विसर्जनाच्या व्यवस्थेचा दर्जा वाढवण्यासाठी महापालिकेने कृत्रिम हौदांची संख्या १६ वरून ३२ वर नेण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. शाडू मातीच्या मूर्तींसाठी विशेषतः १६ नवीन कृत्रिम हौद उभारले जाणार असून पीओपी मूर्तींसाठी स्वतंत्र हौदांची व्यवस्था केली जाणार आहे. यामुळे मूर्तींचे योग्य वर्गीकरण, पर्यावरणपूरक विसर्जन आणि सुलभ व्यवस्थापन शक्य होईल. मूर्ती विक्रेत्यांसाठी ऑनलाइन नोंदणी प्रणाली लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. नागरिक, गणेश मंडळे, स्वयंसेवी संस्था आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे काम करून शहराचा उत्सव अधिक पर्यावरणस्नेही आणि आदर्श व्हावा. गणेश मंडळे, स्वयंसेवी संस्था आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्यासाठी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही आयुक्त सिंह यांनी केले.

### ‘पुनरावर्तन’ मोहीम राबवली जाणार

पिंपरी चिंचवड महापालिकेत यंदा गणेशोत्सव काळात इको एक्झिस्ट फाउंडेशन या संस्थेच्या मदतीने ‘पुनरावर्तन’ मोहीम राबवली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत शाडू मातीच्या गणेश मूर्तींचे विसर्जन केल्यानंतर ती माती पुन्हा संकलित करून मूर्तिकारांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले जाणार आहे. त्यानंतर मूर्तिकार ती माती पुन्हा मूर्तींसाठी वापरू शकणार आहेत.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग



### रूपाची ओळख नामानेच होते

नुसत्या शास्त्रपठणामुळे होणाऱ्या ज्ञानापेक्षा भक्ती ही निश्चित श्रेष्ठ आहे. भक्ती म्हणजे परमात्मस्वरूपाचे परमप्रेम होय. कर्म, ज्ञान, योग ही साधने असून भक्ती हे साध्य आहे. कर्ममार्गामध्ये, नुसते कर्म बरोबर करण्याच्या हिशेबात मन अडकून जाते; म्हणून नुसता कर्ममार्गी कर्मठ आणि जड बनतो आणि त्याला भगवंताचा विसर पडतो. योगामध्ये वृत्तींना आवरून धरण्याची खटपट करावी लागते. वृत्ती शांत झाल्या म्हणजे मन शून्याकार होते. वृत्ती आवरणाऱ्याला भगवंताचे प्रेम असेलच असे सांगता येत नाही. ज्ञानमार्गामध्ये आत्मानात्मविचाराला प्राधान्य असल्याने तिथे बुद्धीच्या सामर्थ्यावर फार भर असतो. पण मायेचा जोर फार विलक्षण असल्यामुळे, साधकाला ती केव्हा फसवील याचा नेम नसतो. ज्ञानमार्ग फार कठीण आहे. ज्ञानमार्गी माणसाला अभिमानाची बाधा लवकर होते. माझे मतच तेवढे खरे असे तो धरून चालतो. ज्ञानी मनुष्य जगताला मायाकार्य मानतो; म्हणजेच जगत् मिथ्या आहे असे तो समजतो. परमात्मा जर सर्वव्यापी आहे, तर हे जगत् त्याच्यामध्येच असले पाहिजे, म्हणून भक्त या सृष्टीला मिथ्या न मानता, भगवंताची लीला समजतो. त्याला या सृष्टीमध्ये सर्व ठिकाणी भगवंताचा महिमा, त्याचे विभूतिमत्व, आणि त्याचा आनंद भरलेला दिसून येतो.

सृष्टीमधले सौंदर्य, माधुर्य, मनोहर भाव, पावित्र्य आणि प्रेम पाहून जीव मोहित होतो. पण सृष्टीमधल्या विभूतिरूपांची उपासना करून जीवाची तृप्ती होत नाही, कारण विभूती हे साक्षात् भाव नाहीत. म्हणून भगवंताच्या साक्षात् गुणांची आणि भावांची जरुरी लागते. त्यांच्या प्राप्तीने जीवाची तृप्ती होते. मात्र सौंदर्याने आणि माधुर्याने भरलेले हे भगवंताचेच रूप आहे हे समजायला त्याला भगवंताचे नाम देणे जरूर आहे. कारण त्या रूपाला भगवंताचे नाम दिले नसेल तर ते रूप मायावी राक्षसाचे देखील ठरेल. कुंभाराने एकाच मातीपासून अनेक प्रकारची भांडी तयार केली; प्रत्येक भांड्यात मातीशिवाय दुसरे काहीच नाही, तरी प्रत्येक भांड्याचे नाव निराळे! तुकारामबुवा एवढे मोठे संत बनले, पण भगवंत सर्व ठिकाणी व्यापून आहे म्हणून ते विठोबाला ' राम ' म्हणाले नाहीत, किंवा दत्ताला 'महादेव' म्हणाले नाहीत. जगत् हे भगवंतापासून भिन्न नाही, जगतात आढळणारी सर्व रूपे भगवंताची आहेत, पण रूपाची ओळखण नामानेच होते. प्रत्यक्ष आकाराला आलेली अनेक रूपे नाहीशी झाली तरी त्यांचे नाव टिकून राहाते. म्हणजे नाम हे देशकालाच्या मर्यादेच्या पलीकडे असते. म्हणून ते रूपापेक्षा जास्त सत्य होय; आणि जे सत्य आहे, ते श्रेष्ठ असलेच पाहिजे. सत्य वस्तू ओळखणे हाच परमार्थ होय.


**बोधवचन:- भगवंताची रूपे जेथून येतात, तेथे 'नामा'चे वास्तव्य आहे.**

# जनतेला स्पष्ट जाणवणारा फरक.. कुठे 'तो' मुख्यमंत्री आणि कुठे 'हा'



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**सत्ता म्हटल्यानंतर कोणत्याही दोन समान पदांमध्ये तुलना ही होणारच ! साहजिकच, त्यामुळे पूर्वीचा मुख्यमंत्री आणि आताचा मुख्यमंत्री अशी चर्चा जोर धरू लागली आहे. कुठे 'तो' मुख्यमंत्री आणि कुठे 'हा' , असे उद्गार सर्वसामान्य नागरिकाच्या तोंडी दिसू लागले आहेत.**





### घर मिळू नये म्हणून वेठीस..

एका मुख्यमंत्र्यानं कुठेही घर मिळू नये, म्हणून वेठीस धरलं आणि एका मुख्यमंत्र्यानं एका विनंतीवरून राहतं घर ताब्यात दिलं. ही गोष्ट नव्हे तुलना आहे दोन मुख्यमंत्र्यांची ! एकाच्या दिलदारपणाची, तर एकाच्या अहंकाराची, कोत्या मनोवृत्तीची ! 'काहीही करा, पण त्याला घर मिळता कामा नये', ज्या ज्या ठिकाणी हा निरोप पोचवायचा होता, त्या त्या ठिकाणी पोचवण्यात आला होता. हा संदेश मुख्यमंत्र्यांकडून आला म्हटल्यावर त्यानुसार काम करणं, नाईलाजानं का होईना पण, करावंच लागलं होतं !

### गोष्ट २०१९ सालातली..

साल होतं २०१९.. ज्यांनी हे निर्देश दिले, ती व्यक्ती होती तेव्हाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे ! आणि ज्याला घर मिळू नये, म्हणून प्रयत्न केले जात होते, ती व्यक्ती होती देवेंद्र फडणवीस, त्यावेळचे माजी मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते ! वाचणाऱ्यांना ही अतिशयोक्ती वाटेल, पण 'वर्षा' बंगला सोडल्यानंतर देवेंद्र फडणवीसांकडे स्वतःची गाडीही नव्हती आणि मुंबईत स्वतःचं घरही नव्हतं. आमदारांच्या गाडीनं त्यांनी पुढचा प्रवास केला. मुंबईसारख्या शहरात त्यांना भाड्यानं एक फ्लॅट मिळवण्यासाठी मोठा कालावधी लागला. शेवटी कुठे तरी एक दोन बीएचके घर मिळालं..

### अडचणी ऐकणारा, सोडवणारा..

देवेंद्र फडणवीसांचा एक स्वभाव आहे, ते इतरांच्या अडचणी ऐकतात आणि सोडवतात. मुख्य म्हणजे, स्वतःच्या अडचणी कोणालाच सांगत नाहीत. विरोधी पक्षनेत्याला सरकारी बंगला लगेच मिळावा, अशी अपेक्षा असते. पण, त्यांना जवळपास खंडहर झालेला, इतरांनी 'अनलकी' म्हणून नाकारलेला 'सागर' बंगला देण्यात आला. तो दुरुस्त करायलाच ४-६ महिने लागणार होते. तोपर्यंत त्यांनी घरातले सामान त्या फ्लॅटवर शिफ्ट करून कुटुंबाला नागपूरला पाठवलं, हे प्रत्येक कार्यकर्त्याला माहीत आहे!

### सागर आणि मेघदूत..

विरोधी पक्षनेतेपद असताना सहा महिन्यांनी मिळालेल्या 'सागर' बंगल्याच्या बाजूचा 'मेघदूत' बंगला २०२२ मध्ये उपमुख्यमंत्री झाल्यावर देवेंद्र फडणवीसांनी 'सागर' बंगल्याला जोडून घेतला. कारण, सतत जनतेत वावरणाऱ्या फडणवीसांकडे येणाऱ्या जनसागराला सामावून घेण्यास 'सागर' बंगला पुरेसा नव्हता, म्हणून बाजूला असलेला 'मेघदूत' बंगलाही त्यांच्याकडेच होता..दोन बंगले असले तरी कार्यकर्त्यांची आणि काम घेऊन येणाऱ्यांची तुडुंब गर्दी असायची.. काम होणार याची खात्री असायची!

### आता पाहू नुकताच घडलेला प्रसंग !

भावनिक होऊन हमसून हमसून रडणारा एक मंत्री संपूर्ण महाराष्ट्र आपल्या टीव्हीवर, मोबाईलमध्ये, लॅपटॉपमध्ये पाहत होता..त्याचं हमसून रडणं अगदी एखाद्या लहान मुलासारखं..जणू काही हरवलेली जीवाभावाची गोष्ट परत मिळाली.. यावेळी, पुन्हा बंगला तोच, पण व्यक्ती वेगळी !

### 'मेघदूत' विषयी प्रेम आणि जिव्हाळा..

बंगला 'मेघदूत' आणि भावनाविवश झालेले मंत्री होते शंभूराज देसाई! डोळ्यातून अश्रूंच्या धारा लागण्याचं कारण होतं, त्याच 'मेघदूत' मध्ये त्यांचा जन्म झाला होता आणि माजी गृहमंत्री आजोबा बाळासाहेब देसाई यांच्या मंत्रीपदाच्या कार्यकाळात त्यांचं वास्तव्यही 'मेघदूत' मध्येच होतं.'मेघदूत' शी असलेला जिव्हाळा लक्षात घेऊन शंभूराज देसाई यांनी नवीन सरकार स्थापन झाल्यावर बंगल्यासाठी 'मेघदूत' ची विनंती केली आणि देवेंद्र फडणवीसांनी क्षणाचाही विलंब न लावता ती विनंती मान्य केली, शंभूराज यांच्या मागणीनुसार तो बंगला त्यांना बहाल केला !

### कुठे प्रेम.. कुठे सूडाचे राजकारण!

सगळ्या जनतेला हे समजतं.. एकीकडं उद्धव ठाकरे, ज्यांनी २५ वर्षे 'युती' त असलेल्या नेत्याला नामोहरम करण्यासाठी मिळेल त्या क्षणी अपमानित केलं. घर मिळू नये, म्हणून कारस्थान रचलं. देवेंद्र यांच्या जवळच्या सगळ्या व्यक्तींना काहीही करून कुठल्या ना कुठल्या प्रकरणात गुंतवण्याचे आदेश दिले. अडीच दशकांची मैत्री झुगारून दिली आणि खऱ्या चेहऱ्याखाली लपलेलं खुनशी व्यक्तिमत्त्व समोर आलं आणि दुसरीकडं एका विनंतीवरून ताब्यात असलेलं राहतं घर आपल्या मित्रपक्षाच्या मंत्र्याला देणारे देवेंद्र फडणवीस.. कुठं तो आपलेपणा आणि कुठं तो पेटलेला सूडाग्नी !

### भावनांचा आदर करणारा लोकप्रिय नेता !

देवेंद्र फडणवीस हे नाती जपणारे नेते आहेत.भावनांचा आदर करणारे नेते आहेत. राजकारणापलीकडे जाऊन मैत्री निभावणारे नेते आहेत, हे वारंवार सिद्ध झाले आहे. दुसरीकडे, उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाही शंभूराज देसाई यांनी 'मेघदूत' ची मागणी केलीच असेल, पण 'सागर' बंगल्याला लागूनच 'मेघदूत' असल्यानं उद्धव ठाकरेंनी तो त्यावेळी दिला नसावा, असे आता वाटू लागले आहे. याबाबत शंभूराज देसाई यांचं म्हणणंही बरंच काही अधोरेखित करतं..'विधानसभेच्या निवडणुकीत ५०० मतांनी माझा पराभव झाल्यावर विधानभवनातून 'WE MISS YOU HERE' असा मेसेज करणारे देवेंद्र फडणवीस हे माणसं जोडून ठेवणारे नेते आहेत.

### ही तर फक्त उदाहरणे..

'मेघदूत' असो अथवा 'सागर'.. ही केवळ उदाहरणं आहेत. मुद्दा आहे राजकारणाच्या पद्धतीचा, दृष्टिकोनाचा आणि आपलेपणाचा.. अहंकार तर फडणवीसांनाही आहे, पण तो महाराष्ट्राला पुढे नेण्याचा आहे. त्यांचा स्वार्थ आहे, की महाराष्ट्र अव्वल असावा, समृद्ध व्हावा. उलट, उद्धव ठाकरे यांनी अधिकार वापरला, तो कारस्थान रचण्यासाठी, सूड घेण्यासाठी आणि स्वतःच्या कुरवाळलेल्या अहंकाराला सुखावण्यासाठी ! ज्यावेळी विकास करण्याची संधी होती, त्यावेळी त्यांनी विघातक खेळी केल्या, केवळ देवेंद्र फडणवीस यांचे राजकारण संपवण्यासाठी.. नको नको ती दूषणे दिली.. प्रसंगी,फडतूस म्हणाले, कलंक म्हणाले आणि अगदी खालच्या पातळीवरील बरंच काही म्हणून डिवचले, ते सुद्धा जनतेनं पाहिलं.

### दोन विचारसरणीमधील फरक..

एक नेता महाराष्ट्र उभा करतो, आणि दुसरा केवळ इतरांना खाली खेचण्यात धन्यता मानतो. म्हणूनच आज महाराष्ट्र संवेदना जपणाऱ्या देवेंद्र फडणवीसांच्या मागे ठामपणे उभा आहे, असाच उभा राहील, हे सांगण्यासाठी ज्योतिषाची गरज नाही !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.


# राजकीय हस्तक्षेपाचे प्रतिबिंब



भूमिका

**गेल्या १५ दिवसांत राज्यातील दोन महत्त्वाच्या प्रकरणांचा दोन स्वतंत्र न्यायालयांनी सारखाच निकाल देत तपास यंत्रणांच्या तपासातील त्रुटींवर बोट ठेवून पुराव्यांअभावी आरोपींना निर्दोष सोडले. या दोन्ही निकालांबाबत राज्य सरकारची भूमिका सध्या चर्चेत आहे.**

मुंबईतील उपनगरीय लोकलमधील साखळी बॉम्बस्फोटांशी संबंधित खटल्याचा निकाल देताना मुंबई उच्च न्यायालयाने सर्व १२ आरोपींची निर्दोष सुटका केली. या निकालाच्या विरोधातील जनआक्रोश लक्षात घेऊन राज्य सरकारने तातडीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आणि निकालाला स्थगितीही मिळवली.याउलट चित्र २००८ सालच्या मालेगाव बॉम्बस्फोटांशी संबंधित निकालाबाबत पाहायला मिळाले. विशेष सत्र न्यायालयाने भाजपच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर आणि लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहितसह खटला चालवण्यात आलेल्या सर्व सात आरोपींची पुराव्यांअभावी निर्दोष सुटका केली. तथापि, या निकालाला राज्य सरकार उच्च न्यायालयात आव्हान देणार की नाही हे स्पष्ट झालेले नाही. परंतु, मालेगाव बॉम्बस्फोट तपासाचा घटनाक्रम पाहता त्या त्या वेळच्या सत्ताधाऱ्यांच्या हस्तक्षेपामुळे अशा महत्त्वांच्या तपासाची दिशा कशी बदलली जाते आणि सदोष तपास



होऊन न्यायालयीन निकालावर त्याचा कसा परिणाम होतो ही बाब अधोरेखित केली.वास्तविक, सत्ताधारी आणि न्यायव्यवस्था या दोन समांतर रेषा असून त्यांनी समांतरच राहणे अपेक्षित आहे. परंतु, राजकीय हस्तक्षेपामुळे तपासाची दिशा बदलल्याची आणि सत्ताधाऱ्यांना अपेक्षित निकाल येण्याची देशभरात अनेक उदाहरणे आहेत. यातून या दोन्ही व्यवस्था बऱ्याचदा स्पर्शिक बनल्याचेही चित्र अनेकदा निर्माण झाले आहे. अर्थात, बऱ्याच प्रकरणांत सत्ताधाऱ्यांच्या अशा हस्तक्षेपांना न्यायालयांनी चपराकही लगावली आहे. गुजरात येथे २००२ मध्ये उसळलेल्या दंगलीदरम्यानचे बिल्किस बानो सामूहिक बलात्कार प्रकरण आणि प. बंगाल येथील आरजी कर वैद्याकीय महाविद्यालयातील बलात्कार प्रकरण ही त्याची उदाहरणे. परंतु, अन्य प्रकरणे राजकीय हस्तक्षेपामुळे कायम न्यायाच्या प्रतीक्षेतच राहिली हे नाकारता येणार नाही.अंधश्रद्धा निर्मूलन संस्थेचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्ये प्रकरणात उजव्या विचारसरणीच्या आरोपींना अटक करण्यात आली होती. परंतु, दाभोलकर यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या ते पिस्तूल सापडलेच नसल्याचे सीबीआयने न्यायालयात सांगितले. पुराव्यांअभावी सगळ्या आरोपींची काही महिन्यांपूर्वी सुटका केली गेली. विशेष म्हणजे, या प्रकरणी सीबीआयने उच्च न्यायालयात अद्याप अपीलच केलेले नाही. दाभोलकर कुटुंबीयांनीच निकालाला उच्च न्यायालयात आव्हान दिले असून सीबीआयकडून किंवा राज्य सरकारकडून निकालाला आव्हान देण्याची शक्यता धूसर असल्याचे न्यायालयाला त्यांनी सांगितले. कॉ. गोविंद पानसरे हत्या प्रकरणातील आरोपी हे दाभोलकर प्रकरणातीलच आहेत आणि त्यांच्यावर खटला चालवण्यात येत आहे. तथापि, या प्रकरणातही फरारी आरोपींचा छडा लागत नसल्याचे एटीएसने न्यायालयाला सांगितले आहे.दिल्ली विद्यापीठाचे प्रा. जी. एन. साईबाबा यांना शहरी नक्षलवादाच्या आरोपांप्रकरणी अटक करण्यात आली होती. सुरुवातीला उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने त्यांची निर्दोष सुटका केली. निकालाच्याच दिवशी तत्परता दाखवत राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आणि निकाल प्रक्रियेतील त्रुटींमुळे सर्वोच्च न्यायालयानेही निर्णय पुन्हा देण्याचे आदेश उच्च न्यायालयाला दिले. अखेर प्रकरणावर पुन्हा सुनावणी होऊन उच्च न्यायालयाने साईबाबा यांची निर्दोष सुटका केली.देशातील अन्य अशा प्रकरणांचा विचार केला तर उत्तर प्रदेशातील योगी सरकारने महत्त्वाच्या प्रकरणांत हस्तक्षेप करून तपासाची दिशा बदलण्याचा आरोप अनेकदा झाला आहे. यातील बहुतांश प्रकरणांत सर्वोच्च न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला होता. उत्तर प्रदेशात २०२० मध्ये दलित महिलेवर झालेले कथित सामूहिक बलात्कार आणि हत्येशी संबंधित हाथरस प्रकरण, राजकीय हस्तक्षेप, राज्य सरकार आणि प्रशासनाच्या अयोग्य व्यवस्थापनाच्या दाव्यांमुळे कलंकित झाले.

## संपादकीय »

### तेलतिरपीट

***आपल्या देशातील खासगी तेल शुद्धीकरण कंपन्या रशियन तेलाची खरेदी करून अन्य देशांस विकतात.***

भारत अजूनही रशियाकडून खनिज तेल खरेदी करतो म्हणून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आपल्या मित्रावर भलतेच संतापलेले दिसतात. आता तर त्यांनी आधीच्या २५ टक्के इतक्या आयात शुल्कात भारतीय उत्पादनांसाठी आणखीनच वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

तो घेण्याआधी २४ तासांची मुदत निश्चित करण्याचे औधत्य त्यांनी दाखवले. अमेरिकी वेळेनुसार बुधवारी संपलेल्या या मुदतीत आपण रशियाच्या तेल खरेदीबाबत काय तो निर्णय घ्यायला हवा होता, असे त्यांचे म्हणणे होते. भारताने ही रशियन तेल खरेदी त्यांना वाटते म्हणून लगेच थांबवायला हवी, यासाठी ही तातडीची कारवाई. वास्तविक अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प हे आरूढ होण्याच्या आधीपासून आपण रशियाकडून तेल खरेदी करत आहोत. ट्रम्प यांचे पूर्वसुरी जो बायडेन यांस हे पूर्ण माहीत होते. पण तरीही असला अगोचरपणा त्यांनी कधी केला.

उत्तराखंड राज्याचा नकाशा हातात धरून पाहिलात, तर या राज्यातील १३ जिल्ह्यांपैकी उत्तरकाशी हा सर्वांत वरचा आणि आकाराने सर्वांत मोठा जिल्हा आहे. याच जिल्ह्यातील धराली गावात ५ ऑगस्टच्या मंगळवारी भूस्खलन आणि खीरगंगा नदीला पूर अशा विचित्र घटनेमुळे हाहाकार माजला.

## ‘चारधाम’च्या जिल्ह्यांना फटके बसतच राहाणार

हे अर्धे गाव चिखलात बुडाले. ‘चार धाम’ यात्रेपैकी गंगोत्री आणि यमुनोत्री ही तीर्थस्थाने उत्तरकाशी जिल्ह्यात आहेत. चामोली जिल्ह्यात बद्रीनाथ, तर रुद्रप्रयाग जिल्ह्यात केदारनाथ असून हे दोन्ही जिल्हे उत्तरकाशीलगत आहेत. या तीन जिल्ह्यांनी १९९१ च्या भूकंपापासून अनेक आपत्तींचे फटके खाल्लेले आहेत. तरीही कुणालाच जाग आलेली नाही हे धराली येथील घटनेतून दिसले.दरड कोसळण्याचे मोठे प्रकार गंगोत्री मार्गावर गेल्या तीन महिन्यांत दरमहा किमान एक, या गतीने झालेले आहेत. एकंदर उत्तराखंडात दरड कोसळण्याच्या घटनांचा अभ्यास ‘इस्रो’ने १९८९ ते २०२३ च्या आकडेवारीवरून केला असता एकंदर ३४ वर्षांत दरडी कोसळण्याचे १२,३१९ प्रकार घडले होते, त्यापैकी ११०० प्रकार एकट्या २०२३ या वर्षात घडले, असे नमूद झाले. त्यानंतरच्या २०२४ या वर्षात तर, फक्त पावसाळ्यातच या राज्यातल्या १८१३ दरडी कोसळल्या. यापैकी निम्म्याहून अधिक प्रकार



नेहमीच चारधाम यात्रेच्या मार्गावर होत असतात आणि यात्रेकरू खोळंबतात. यावर ‘उपाय’ म्हणून हा मार्ग ‘बारमाही’ करण्याचे केंद्र सरकारने ठरवले. पण यात्रेकरूंच्या सोयीपेक्षा पर्यावरणाकडे सरकारने लक्ष दिले असते, तर या भागात ‘विकास प्रकल्प’ आणि ‘पायाभूत सुविधां’च्या उभारणीमुळेच वाढणारे उत्पात जरा तरी आटोक्यात राहिले असते. आता तीही शक्यता नाही.मुळात हिमालय हा ‘तरुण’ – म्हणजे नंतर तयार झालेला पर्वत, त्यामुळे तो तुलनेने ठिसूळ. त्यात उत्तरकाशी, चामोली, टिहरी गढवाल हे उत्तराखंडचे जिल्हे भौगोलिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील. या भागात १९९१ उत्तरकाशीत मोठा (६.८ रिक्टर क्षमतेचा) भूकंप झाला, तेवढ्याच क्षमतेचा भूकंप १९९९ मध्ये चामोली जिल्ह्यात झाला, तेव्हा टिहरी धरण प्रकल्प सरकारने रेटल्यामुळे भूकंप-प्रवणता वाढली, असा आरोप झाला. धरण बांधले जाण्यापूर्वी आणि बांधले जात असताना जे अभ्यास झालेले होते, त्यांआधारे हा आरोप खरा असल्याचेही दिसून आले. पण नव्या ‘चारधाम महामार्ग’ प्रकल्पासाठी तर ‘राष्ट्रीय सुरक्षेसाठी आवश्यक बाब’ म्हणून पर्यावरण पडताळणीचीही गरज नसल्याचे सांगून तो रेटला गेला आहे. याच मार्गावरल्या सिलक्यारा-बारकोट बोगद्याच्या कामात हलगर्जी झाल्यामुळे तब्बल १६ दिवस, ४१ मजूर आतमध्ये अडकून पडले होते. अन्यही अनेक नद्या या जिल्ह्यातील हिमनद्यांपासून (ग्लेशियरपासून) उगम पावतात आणि अखेर गंगा अथवा यमुना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रवाहांना मिळतात. यापैकी नुकत्याच आपत्तीग्रस्त झालेल्या धराली गावातली ‘खीरगंगा’ नदी ही तर ठिसूळ डोंगरांचा मातकट गाळ घेऊनच वाहात असते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## मोदींना टोला
## ट्रम्प रोज आपल्या देशाची खिल्ली उडवत आहेत

# गद्दारांच्या मताला मी किंमत देत नाही!

## तर मग निवडणुका घेताच कशाला?



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राहुल गांधींनी आज मला जेवणाचं निमंत्रण दिलं आहे मी तिथे जाणार आहे. शिवाय दिल्लीत दरवर्षी मी येत असतोच. इंडिया आघाडीच्या बैठकीतले चर्चेचे विषय काय आहेत ते चर्चा झाल्यानंतर मी तुम्हाला सांगेन. आमच्या परिने आम्ही चर्चा करत आहोत. असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. उद्धव ठाकरे दिल्ली दौऱ्यावर आहेत. दरम्यान उद्धव ठाकरेंनी विविध प्रश्नांना उत्तरं दिली. डोनाल्ड ट्रम्प यांनी जे टॅरिफ लागू केलं आहे त्याबाबत प्रश्न विचारला असता त्यावरही उद्धव ठाकरेंनी उत्तर दिलं आहे.**

उपराष्ट्रपतींना तडकाफडकी राजीनामा का द्यावा लागला? तसंच राजीनामा दिल्यानंतर ते आहेत कुठे? यावर चर्चा झाली पाहिजे. प्रत्येक राज्याच्या निवडणुका जेव्हा होत आहेत तेव्हा होणार. बिहारमध्ये मतदार याद्यांचा घोळ झाला त्यात अंतिम निर्णय काय झाला माहीत नाही. पण मतदाराची ओळख त्याने पटवून द्यायची असं काहीतरी ठरल्याचं कळतं आहे. देशात अघोषित एनआरसी लागू झालाय का? हा प्रश्न यामुळे निर्माण होतो आहे. सीएए आणि एनआरसीचा विषय गाजला होता तेव्हा आंदोलनं झाली होती. तेव्हाही हाचा मुद्दा होता. आता निवडणूक आयोगाने याचं स्पष्टीकरण दिलं पाहिजे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडत असताना ईव्हीएमवर आमचा आक्षेप असताना आणखी एक अपारदर्शकता आणली आहे की व्हीव्हीपॅट मशीनच काढलं आहे. मग निवडणुका घेताच कशाला? जाहीर करा की आमचे इतके जिंकले. बटण दाबलं जातं आहे, दिवा लागतो आहे, रिसिट दिसते आहे पण रजिस्टर्ड कुठे होते आहे दिसतं आहे. बॅलेट पेपरवर स्पष्ट कळत होतं. आता व्हीव्हीपॅट काढणार असाल तर निवडणुका घेण्याचा फार्स घेता कशाला? असं उद्धव ठाकरे म्हणाले. एकनाथ शिंदेंही दिल्लीत आहेत याबाबत विचारलं असता उद्धव ठाकरे म्हणाले त्यांच्या कुठल्या वक्तव्यांवर उत्तर देण्याइतके ते महान नाहीत. गद्दार हा गद्दार असतो, त्यामुळे गद्दाराच्या मताला मी किंमत देत नाही. त्यांच्या मालकांना ते भेटायला असतील तर आपण काय बोलणार? असाही टोला उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.ट्रम्प टॅरिफचा फटका सामान्यांना बसणार आहे. डोनाल्ड ट्रम्प आपल्या देशाची खिल्ली उडवत आहेत. आपण त्यांना अवाक्षरानेही उत्तर देत नाही.

### ईव्हीएमवर आमचा आक्षेप

की व्हीव्हीपॅट मशीनच काढलं आहे. मग निवडणुका घेताच कशाला? जाहीर करा की आमचे इतके जिंकले. बटण दाबलं जातं आहे, दिवा लागतो आहे, रिसिट दिसते आहे पण रजिस्टर्ड कुठे होते आहे दिसतं आहे. बॅलेट पेपरवर स्पष्ट कळत होतं. आता व्हीव्हीपॅट काढणार असाल तर निवडणुका घेण्याचा फार्स घेता कशाला? असं उद्धव ठाकरे म्हणाले.

देशाचं सरकार नेमकं चालवतंय कोण? मी माझं मत आधीही व्यक्त केलं आहे आपल्या देशाला पंतप्रधान, गृहमंत्री, संरक्षण मंत्री यांची गरज आहे. कारण आत्ताचे पंतप्रधान हे भाजपाचे आहेत. ऑपरेशन सिंदूर झाल्यानंतरही मोदी बिहारला गेले, पहलगामला नाही. या सरकारकडे परराष्ट्र नीती वगैरे काही नाही, खंबीर धोरण नाही. अमेरिका डोळे वटारत असताना डोवाल रशियाला गेले आहेत. पंतप्रधान चीनला चालले आहेत. चीन बरोबरचे संबंधही त्यांच्या मित्रासाठी दरवाजे उघडतात का? पण हे सगळं होत असलं तरीही परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत हे सरकार सपशेल अपयशी ठरलंय असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.जीनामा का द्यावा लागला? तसंच राजीनामा दिल्यानंतर ते आहेत कुठे? यावर चर्चा झाली पाहिजे. प्रत्येक राज्याच्या निवडणुका जेव्हा होत आहेत तेव्हा होणार. बिहारमध्ये मतदार याद्यांचा घोळ झाला त्यात अंतिम निर्णय काय झाला माहीत नाही. पण मतदाराची ओळख त्याने पटवून द्यायची असं काहीतरी ठरल्याचं कळतं आहे. देशात अघोषित एनआरसी लागू झालाय का? हा प्रश्न यामुळे निर्माण होतो आहे. सीएए आणि एनआरसीचा विषय गाजला होता तेव्हा आंदोलनं झाली होती. तेव्हाही हाचा मुद्दा होता. आता निवडणूक आयोगाने याचं स्पष्टीकरण दिलं पाहिजे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडत असताना ईव्हीएमवर आमचा आक्षेप असताना आणखी एक अपारदर्शकता आणली आहे

# गुन्हेगारी वाढण्यास राजकीय शक्तीच कारणीभूत

## अजितदादांकडे बीडचे पालकमंत्रिपद आहे, गुन्हेगारी थांबण्याऐवजी सुरूच



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बीडचे पालकत्व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे असले तरी जोपर्यंत परळी तालुक्यातील सर्व शासकीय कर्मचारी बदलले जात नाही तोपर्यंत गुन्हेगारी प्रवृत्ती थांबवता येणार नाही. धनंजय मुंडे यांना पुन्हा मंत्रिमंडळात सामील करून घेतले तर अजितदादांचा पक्षच संपेल, असे मत मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आज पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.**

बीडमध्ये गुन्हेगारी वाढण्यास तेथील राजकीय शक्तीच कारणीभूत असून, प्रशासनही तितकेच यामध्ये गुंतले आहे. अजितदादांकडे बीडचे पालकमंत्रिपद आहे, तरीही गुन्हेगारी थांबण्याऐवजी सुरूच आहे. यामुळे प्रशासनावर वचक नाही, हे सिद्ध होते. गुन्हेगारीला आळा घालायचा असेल तर परळी तालुक्यातील प्रशासनात असलेल्या सर्वच कर्मचारी यांच्या बदल्या अन्यत्र करायला हव्यात, तसेच नव्याने आलेले अधिकारी अन्य जिल्ह्यांतून आलेले असावेत, तरच काही प्रमाणात याठिकाणी गुन्हेगारीला आळा बसू शकतो.

### आमच्या लढ्याला पाठिंबा द्यावा

याबाबत विचारले असता ते म्हणाले, त्यांना पुन्हा मंत्रिमंडळात घेतले तर अजितदादांचा पक्ष संपेल. त्यांनी शासकीय निवासस्थान सोडलेले नाही याबाबत ते म्हणाले, तो राजकीय विषय असून, आपणास त्याबाबत काहीच बोलायचे नाही. मराठा आरक्षणासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी सक्रिय होऊन आमच्या लढ्याला पाठिंबा द्यावा.

महादेव मुंडे यांच्या हत्येचा तपास विशेष चौकशी पथकाकडून करण्याची मागणी आपण केली. या मागणीला सरकारने सकारात्मक प्रतिसाद देत चौकशी पथक नियुक्त केले असून, या पथकाकडून योग्य तो न्याय ज्ञानेश्वरी मुंडे यांना मिळेल, अशी आशा आहे. जे खरेच गुन्हेगार आहेत, त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. संशयितांची खरी नावे चौकशी पथकाला देण्यास आपण सांगितले असून, यानुसार तपास सुरू आहे. भगिनीला न्याय मिळाला पाहिजे, अशीच आपली भूमिका असून, ती कोणत्या जातीची आहे, याला महत्त्व नाही. अन्याय करणारे यांना शासन झालेच पाहिजे.

निर्धार

## अमेरिकेच्या आयात शुल्कवाढीनंतर मोदी यांचा निर्धार

# शेतकऱ्यांच्या हिताशी तडजोड नाही!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**'देश आपल्या शेतकरी, मच्छीमार आणि दुग्ध क्षेत्राच्या हिताशी कधीही तडजोड करणार नाही. गरज पडल्यास मी मोठी किंमत मोजण्यास तयार आहे,' असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी जाहीर केले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची घोषणा केल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे विधान केले आहे.**

## ब्राझीलच्या राष्ट्राध्यक्षांचा मोदींना फोन



देशाच्या हरितक्रांतीचे शिल्पकार कृषीशास्त्रज्ञ एम. एस. स्वामीनाथन यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित जागतिक परिषदेत मोदी बोलत होते. कच्च्या तेलासाठी रशियावरील अवलंबित्व कमी करून भारतावर दबाव आणण्यासाठी अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील व्यापार शुल्क आणखी वाढवले आहे. अमेरिका मका, सोयाबीन, सफरचंद, बदाम आणि इथेनॉल यासारख्या उत्पादनांवरील कर कमी करून तसेच अमेरिकेतील दुग्धजन्य उत्पादनांसाठी भारतात प्रवेश वाढवू इच्छिते. परंतु भारताने या मागण्यांना विरोध दर्शवला आहे. स्वामीनाथन यांच्या सन्मानार्थ एक नाणे आणि टपाल तिकिटाचे अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. भारतीय शेतीसाठीचे स्वामीनाथन यांचा दृष्टिकोन मांडताना, पंतप्रधानांनी पोषण सुरक्षा, पीक विविधीकरण आणि हवामान-प्रतिरोधक वाणांच्या विकासाची गरज अधोरेखित केली. प्रत्येक जिल्ह्यात प्रत्यक्ष निर्णय समर्थन प्रणाली उपलब्ध करून देण्याची सूचना पंतप्रधानांनी केली. रशियाकडून तेल खरेदी करत असल्याबद्दल दंड म्हणून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी भारतावर २५ टक्के अतिरिक्त आयातशुल्क लादले आहे. यामुळे भारतावरील आयात शुल्काचा आकडा हा ५० टक्क्यांवर गेला आहे. यादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्राझीलचे अध्यक्ष लुइज इनासिओ लूला दा सिल्वा यांनी फोनवर चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे. नुकतेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ब्राझील आणि भारत या दोन देशांवर ५० टक्के निर्यात शुल्क लादले आहे, यामुळे या दोन नेत्यांमध्ये झालेल्या संवादाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत याबद्दल माहिती दिली आहे.पंतप्रधान मोदींनी केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, "राष्ट्राध्यक्ष लूला यांच्याबरोबर चांगली चर्चा झाली. माझा ब्राझीलचा दौरा स्मरणीय आणि अर्थपूर्ण बनवल्याबद्दल मी त्यांचे आभार मानले. व्यापार, उर्जा, तंत्रज्ञान, संरक्षण, आरोग्य आणि इतरह अनेक क्षेत्रात आपल्यातील धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. ग्लोबल साऊथ देशांमधील एक भक्कम लोक-केंद्रीत भागीदारी ही सर्वांसाठीच फायदेशीर आहे," असे पंतप्रधान मोदी एक्स पोस्टमध्ये म्हणाले आहेत.अधिकृत निवेदनानुसार, पीएम मोदी यांनी, गेल्या महिन्यात त्यांनी केलेल्या ब्राझील दौऱ्याची आठवण करून दिली, या दौऱ्यावेळी दोन्ही नेत्यांनी व्यापार, तंत्रज्ञान, उर्जा, संरक्षण, शेती, आरोग्या आणि लोकांमधील संबंध यामध्ये सहकार्य आणखी दृढ करण्याच्या रुपरेषेवर सहमती दर्शवली होती.या चर्चेच्या माध्यमातून त्यांनी भारत-ब्राझील यांच्यातील धोरणात्मक भागीदारीली नवीन उंचीवर नेण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. दोन्ही नेत्यांनी परस्परांच्या हिताच्या वेगवेगळ्या प्रादेशिक आणि जागतीक मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण केली, असेही निवेदनात म्हटले आहे लूला यांनी ते पंतप्रधान मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी बोलतील असे सांगितल्याच्या दुसऱ्याच दिवशी फोनवरून ही चर्चा झाली आहे. यावेळी लूला यांनी ते वाटाघाटींसाठी ट्रम्प यांना फोन करणार नसल्याचे म्हटले होते. "मी त्यांना बोलवेन, मी शी जिनपिंग यांना फोन करेन, मी पंतप्रधान मोदी यांना फोन करेन. मी फक्त पुतिन यांना फोन करणार नाही.

### या मागण्यांना विरोध दर्शवला


अमेरिका मका, सोयाबीन, सफरचंद, बदाम आणि इथेनॉल यासारख्या उत्पादनांवरील कर कमी करून तसेच अमेरिकेतील दुग्धजन्य उत्पादनांसाठी भारतात प्रवेश वाढवू इच्छिते. परंतु भारताने या मागण्यांना विरोध दर्शवला आहे.स्वामीनाथन यांच्या सन्मानार्थ एक नाणे आणि टपाल तिकिटाचे अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले.

# पुतिन वर्षाखेरीस भारत दौऱ्यावर

## भारत-रशिया द्विपक्षीय संबंधांच्या पार्श्वभूमीवर पुतिन यांचा संभाव्य दौरा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन येत्या वर्षअखेर भारत दौऱ्यावर येणार असल्याची माहिती राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी गुरुवारी दिली. रशियाच्या दौऱ्यावर असलेल्या डोभाल यांनी एका स्थानिक वाहिनीला याबाबत माहिती दिल्याचे 'रॉयटर्स' या वृत्तसंस्थेने म्हटले आहे. रशियन सुरक्षा परिषदेचे सचिव सर्गेई शोइगु यांची डोभाल यांनी गुरुवारी भेट घेतली.**



आयातशुल्कामुळे अमेरिकेबरोबर संबंध ताणले गेले असतानाच रशियाबरोबर संरक्षण संबंध अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने ही भेट झाली.यावेळी पुतिन यांच्या संभाव्य भारत भेटीबाबत चर्चा झाली असली तरी त्याची तारीख मात्र अद्याप निश्चित झालेली नाही.अमेरिकेकडून भारतावर आयातशुल्क लादले जात असताना दुसरीकडे रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे यावर्षी भारत दौरा करणार असल्याची बाब समोर आली आहे, भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी गुरूवारी याबद्दल माहिती दिली आहे. ही भेट २०२५ च्या अखेरीस होण्याची शक्यता असल्याचे वृत्त रॉयटर्सने रशियातील इंटरफॅक्स वृत्तसंस्थेच्या हवाल्याने दिले आहे. अजित डोवाल हे सध्या रशियात आहेत. भारत व रशिया दरम्यान संरक्षण भागीदारी वाढविण्यासाठी डोवाल हे रशियाच्या दौऱ्यावर गेले आहेत. भारत व अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या व्यापार संबंधित वाटाघाटी दरम्यान पुतिन यांचा भारत दौरा महत्वाचा ठरू शकतो. काल (बुधवारी) अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर अतिरिक्त २५ टक्के आयातशुल्क लादण्याचा निर्णय घेतला. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने अमेरिकेने हा निर्णय घेतला आहे.

### डोवाल रशियाच्या दौऱ्यावर

रशिया व युक्रेनमध्ये सुरू असलेले युद्ध जोपर्यंत रशियाकडून थांबवले जात नाही, तोपर्यंत रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांना आणखी परिणाम भोगावे लागू शकतात, असा इशाराही ट्रम्प यांनी दिला आहे.आम्ही अध्यक्ष पुतिन यांच्या भारत भेटीबाबत ऐकून उत्साहित आणि आनंदी झालो आहोत. मला वाटते की तारखा देखील जवळपास निश्चित झाल्या आहेत," असे डोभाल म्हणाले.

# TRP चा उच्चांक, सगळे रेकॉर्ड मोडले!

'ठरलं तर मग' मालिकेत गेल्या आठवड्यात वात्सल्य आश्रम केसचा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला. मधुभाऊंना निर्दोष सोडवण्यासाठी अर्जुनला फक्त ३० दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला होता. या संधीचं अर्जुन सोनं करतो आणि गुन्हा सिद्ध झाल्यावर साक्षी-प्रियाची रवानगी जेलमध्ये केली जाते. गेल्या अडीच वर्षांपासून प्रेक्षक या जबरदस्त ट्विस्टची आतुरतेने वाट पाहत होते. निकाल जाहीर होताना 'ठरलं तर मग'च्या प्रत्येक एपिसोडबद्दल प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली होती. गेल्या काही दिवसांपासून वात्सल्य आश्रम केसचा निकाल काय लागेल याबद्दल घराघरांत चर्चा झाली. लोकांना हा संपूर्ण सीक्वेन्स खूपच आवडला, यासाठी मालिकेच्या सगळ्या टीमने दिवसरात्र मेहनत केली होती. याची पोचपावती 'ठरलं तर मग'च्या टीमला टीआरपीच्या स्वरुपात मिळाली आहे.मालिकेत ज्या दिवशी कोर्ट केसचा निकाल जाहीर करण्यात आला, त्या विशेष भागाला तब्बल ९.१ TVR रेटिंग मिळालं आहे. यादिवशी तब्बल २.७ कोटी प्रेक्षकांनी 'ठरलं तर मग' मालिका पाहिली. याशिवाय या मालिकेचा गेल्या आठवड्याचा टीआरपी ७.१ एवढा आहे. यापूर्वी कोणत्याही मालिकेला अडीच वर्षांनंतर एवढ्या मोठ्या प्रमाणात टीआरपी रेटिंग मिळालेलं नाही. त्यामुळे या मालिकेने सगळे रेकॉर्ड्स मोडले आहेत.या यशाबद्दल अर्जुन सुभेदारची भूमिका साकारणाऱ्या अभिनेता अमित भानुशालीने खास पोस्ट शेअर करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

# शर्माच्या कॅनडा येथील कॅफेवर पुन्हा गोळीबार!

प्रसिद्ध कॉमेडियन कपिल शर्मा याने काही दिवसांपूर्वी कॅनडा येथे कॅफे सुरू केला आहे. कपिलच्या या कॅफेचं नाव 'कॅप्स कॅफे' असं असून या कॅफेवर महिनाभरात दुसऱ्यांदा गोळीबार करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. स्थानिक माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, कॅनडातील सरे येथे असलेल्या या कॅफेवर गुरुवारी सकाळी गोळीबार करण्यात आला. पहिला हल्ला झाल्यानंतर, १० जुलै रोजी कॅफे पुन्हा एकदा सुरू करण्यात आला होता, त्यानंतर अगदी काही आठवड्यांनंतरच ही घटना घडली आहे.कपिल शर्माचा हा कॅफे ८५ अव्हेन्यू आणि स्कॉट रोडच्या चौकात असून यावर पहाटेच्या सुमारास हा गोळीबार करण्यात आला, ज्यामध्ये कॅफेच्या खिडक्यांना गोळीबारामुळे छिद्र पडल्याचे दिसून आले. हा हल्ला झाला तेव्हा काही कर्मचारी कॅफेमध्ये होते मात्र यामध्ये कोणीही जखमी झाल्याचे वृत्त नाही. कथितपणे लॉरेन्स बिश्नोई गँगमधील एका सदस्याकडून सोशल मीडियावर पोस्ट करत या हल्ल्याची जबाबदारी घेण्यात आली आहे. पोस्टमध्ये लिहिले आहे की, "जय श्री राम, सत श्री अकाल, सर्व भावांना राम-राम. आज कपिल शर्माच्या सरे येथील कॅप्स कॅफेवर जी फायरिंग झाली त्याची जबाबदारी गोल्डी ढिल्लों आणि लॉरेन्स बिश्नोई गँग घेते. आम्ही त्याला फोन केला होतास पण त्याने फोन उचलला नाही, त्यामुळे कारवाई करावी लागली, जर अता देखील उत्तर मिळाले नाही तर पुढील ॲक्शन लवकरत मुंबईमध्ये होईल," असे पोस्टमध्ये म्हटले आहे.१० जुलै रोजी याच कॅफेवर झालेल्या गोळीबाराची जबाबदारी बब्बर खालसा इंटरनॅशनल (बीकेआय) ऑपरेटीव्ह हरजित सिंग लड्डी याने घेतली होती, हा भारतात मोस्ट वॉन्टेड फरारी असून याने देखील सोशल मीडियावर पोस्ट करत हल्ल्याची जबाबदारी घेतली होती. तसेच तूफान सिंग नावाच्या दुसऱ्या एका व्यक्तीसह, लड्डी याने निहंग शिखांबद्दल कपिल शर्माने केलेल्या कथित अपमानास्पद टिप्पणी हे या हल्ल्याचे कारण असल्याचे म्हटले होते.

# तिला दिल्लीला पाठवायला भीती वाटली



सुलेखा तळवलकर या मराठी इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्री आहेत. सध्या त्या 'सावळ्याची जणू सावली' आणि 'मुरांबा' अशा दोन मालिकांमध्ये काम करत आहेत. अशातच त्यांनी नुकतीच त्यांच्या मुलांसह मुलाखत दिली आहे. यावेळी त्यांनी त्यांच्या मुलांच्या शिक्षणाबद्दल माहिती दिली आहे. सुलेखा यांनी त्यांची दोन्ही मुलं आर्य तळवलकर व टिया तळवलकरसह 'लोकमत फिल्मी'ला मुलाखत दिली. त्यांचा मुलगा अभिनय क्षेत्रापासून दूर असून, फिटनेस या क्षेत्रात सक्रिय आहे. तर, त्यांची मुलगी उच्च शिक्षणासाठी दिल्लीला जाणार आहे. याबाबत त्यांनी या मुलाखतीमध्ये सांगितलं आहे. त्यामध्ये त्यांच्या मुलीला तिच्या शिक्षणाविषयी विचारण्यात आलं होतं.सुलेखा यांची मुलगी तिच्या शिक्षणाबद्दल म्हणाली, "आता माझी डिग्री झाली आहे. मी हॉटेल मॅनेजमेंटचं शिक्षण पूर्ण केलं आहे. मला लहानपणापासूनच जेवण बनवण्याची खूप आवड होती. जेवण बनवणं, लोकांना खाऊ घालणं हे मला खूप आवडतं. नंतर मी दादरच्या केटरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. आता दोन महिन्यांपूर्वी मला डिग्री मिळाली आहे. आता मी मॅनेजमेंट ट्रेनिंगसाठी लवकरच दिल्लीला शिफ्ट होत आहे."सुलेखा यांनी यावेळी सांगितलं, "तिनं संपूर्ण देशभरात ५४ क्रमांक मिळवला आहे. तिला पुढच्या शिक्षणासाठी दिल्लीत ॲडमिशन मिळालं आहे; पण मला तिला दिल्लीला पाठवायला भीती वाटली. परंतु, आता तिचं इथलं शिक्षण पूर्ण झालं असून, पुढच्या शिक्षणासाठी ती दिल्लीला चालली आहे.


# डिक्रुझला तमिळतून केलं बॅन?

दक्षिणात्य आणि बॉलिवूडमधील एक लोकप्रिय अभिनेत्री म्हणजे इलियाना डिक्रुझ. ती तिच्या ग्लॅमरस अंदाजामुळे नेहमीच सर्वांचं लक्ष वेधून घेत असते. पण आता ती एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. इलियानाला तमिळ सिनेसृष्टीतून बॅन केलंय अशा सर्वत्र चर्चा रंगल्या होत्या. ही बातमी ऐकून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. आता याबाबतचं सत्य समोर आलं आहे. इलियाना डिक्रूझने एका तमिळ चित्रपटासाठी ॲडव्हान्स रक्कम घेतली होती. परंतु तिने पैसे घेऊनही त्या चित्रपटाचं शूटिंग केलं नाही. यामुळे त्या चित्रपट निर्मात्याचं मोठं नुकसान झालं. नंतर त्या प्रोड्युसरने निर्माता परिषदेकडे तक्रार केली. मिळालेल्या तक्रारीनुसार तामिळ चित्रपट निर्मात्यांनी इलियानाला कोणत्याही चित्रपटासाठी साईन न करण्याचा निर्णय घेऊन तिला बॅन केलं असं बोललं जाऊ लागलं होतं. पण यात किती टक्के आहे याचा खुलासा आता झाला आहे.इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, या संपूर्ण प्रकरणामागचं सत्य जाणून घेण्यासाठी तमिळ फिल्म प्रोड्यूसर्स काऊन्सीलशी चर्चा करण्यात आली. तेव्हा हा अहवाल पूर्णपणे चुकीचा असल्याचं त्यांनी सांगितलं. TFPC कडून अशी कोणतीही बंदी इलियानावर घालण्यात आलेली नाही, असं TFPCचं म्हणणं आहे. त्यामुळे या चर्चांमध्ये कोणतंही तथ्य नसून या सर्व अफवा असल्याचं स्पष्ट झालं आहे.इलियानाने बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं तेव्हा ती दक्षिणात्य चित्रपट सृष्टीमधील लोकप्रिय अभिनेत्री होती. तर टॉलिवूडप्रमाणेच बॉलिवूडमध्येही तिने आपली ओळख निर्माण केली. आज तिचा चाहता वर्ग खूप मोठा आहे. पण गेली तीन-चार वर्ष ती दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये दिसली नाही. 2018 मध्ये रवी तेजाच्या 'अमर अकबर अँथनी'मध्ये दिसली होती.



# भूमिकेसाठी टक्कलही करू शकते", तेजस्वी प्रकाशचं वक्तव्य

तेजस्वी प्रकाश हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आजवर तिने अनेक मालिकांमध्ये मुख्य भूमिका साकारत प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. तिने हिंदीसह मराठीतही काम केलं आहे. अशातच आता अभिनेत्रीने एका मुलाखतीत भूमिकेसाठी तिची काहीही करण्याची तयारी असल्याचं म्हटलं आहे. तेजस्वी प्रकाश कोणत्या न कोणत्या कारणामुळे चर्चेत असते. हिंदीत अभिनेत्रीचा मोठा चाहतावर्ग आहे. अशातच आता तिने नुकतीच 'हिंदुस्तान टाईम्स'ला दिलेल्या मुलाखतीत याबद्दल सांगितलं आहे. यामध्ये तिला टक्कल करण्याबद्दल विचारण्यात आलेलं. यावर ती म्हणाली, "हो मी करू शकते."अभिनेत्री पुढे याबद्दल म्हणाली, "जर एखाद्या भूमिकेसाठी गरज भासली तर मी टक्कलदेखील करायला तयार



आहे. मी अशा गोष्टींसाठी तयार असते. सध्या लोकांनी त्यासाठी वेगवेगळे मार्ग शोधून काढले आहेत. मी अशा काही गोष्टी करत आहे, ज्या ट्रान्सफॉर्मेशनशी संबंधित आहेत. पण, इंडस्ट्रीत सगळ्यांनी प्रत्येक गोष्टीसाठी इतक्या वेगवेगळ्या पर्यायांचा शोध घेतलाय, मग ते केसांचा रंग वेगळा दाखवायचा असो, टक्कल दाखवायचं असो किंवा सोनेरी रंगाचे केस दाखवायचे असो. पण, अजूनतरी प्रत्यक्षात कोणी मला हे करायला सांगितलं नाही; पण कधी जर सांगितलं तर मी नक्कीच ते करेन."तेजस्वी प्रकाश हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय चेहरा असून तिने आजवर 'स्वरागिनी', 'रिश्ते लिखेंगे हम नये', 'सिलसिले बदलते रिश्तों का', 'थपकी प्यार की', 'कसम', 'पेहरेदार पिया की', 'संस्कार', 'कर्ण संगीनी', 'ससुराल सिमर का', 'नागीन ६', 'सेलिब्रिटी मास्टर शेफ', 'खतरो के खिलाडी', 'बिग बॉस' यांसारख्या मालिकांमध्ये व रिॲलिटी शोमध्ये काम केलं आहे.

निर्णय बदलला

## जैस्वालने गोव्याच्या संघात जाण्याचा निर्णय बदलला

# मुंबईने घडवले, हे विसरू नकोस!

### जैस्वालने महिन्याभरातच निर्णय बदलला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघाचा फलंदाज यशस्वी जैस्वाल हा मुंबई संघाकडून डोमेस्टिक क्रिकेट खेळत आला आहे. मात्र मध्यंतरी त्याने मुंबईचा संघ सोडून गोवा क्रिकेट संघाकडून क्रिकेट खेळण्याची इच्छा व्यक्त केली होती. यासाठी त्याने मुंबई क्रिकेट असोसिएशनकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळवले होते. मात्र कालांतराने त्याने आपला निर्णय बदलला. या निर्णयामागे भारताच्या एकदिवसीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा असल्याचे आता समोर आले आहे.**



मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी या प्रसंगाचा उलगडा केला आहे. एमसीएकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर २३ वर्षीय यशस्वी जैस्वालने महिन्याभरातच आपला निर्णय बदलला होता. हा निर्णय बदलण्यामागे रोहित शर्मा असल्याचे नाईक म्हणाले.रोहित शर्माने समजूत काढल्यानंतर यशस्वी जैस्वालने आपला निर्णय बदलला. मुंबई संघाने दिलेल्या संधीमुळेच यशस्वी जैस्वालचा भारतीय क्रिकेट संघात खेळण्याचा मार्ग मोकळा झाला होता.मुंबई मिररशी बोलताना अजिंक्य नाईक यांनी सांगितले की, ज्या मुंबई संघाने तुझे करिअर घडवले, त्या संघाबरोबरच तू राहा, असे रोहित शर्माने यशस्वीला सांगितले. मुंबईच्या संघाने आजवर ४२ वेळा रणजी करंडक जिंकलेला आहे, त्यामुळे या संघाकडून खेळणे हा अभिमान आणि प्रतिष्ठेचा विषय आहे. तसेच मुंबई क्रिकेटमुळेच त्याला भारतीय संघात खेळण्याची संधी मिळाली, विसरू नये. त्यामुळे त्याने या शहराचे आभार मानायला हवेत.याशिवाय यशस्वी जैस्वालने मुंबईतील काही वरिष्ठ खेळाडूंशी चर्चा केली आणि त्यानंतर ना हरकत प्रमाणपत्र माघारी घेतले, असेही अजिंक्य नाईक यांनी सांगितले.

यशस्वी जैस्वालने ईमेलद्वारे ना हरकत प्रमाणपत्र माघारी घेण्याची विनंती केली, जी आम्ही मान्य केली, असेही नाईक म्हणाले. यशस्वी जैस्वाल हा मुळचा उत्तर प्रदेशचा आहे. क्रिकेटसाठी तो मुंबईत आला. २०१९ साली अतिशय लहान वयात त्याने मुंबई संघातून रणजी क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली. मुंबईसाठी त्याने सात प्रथम दर्जाचे सामने खेळले आहेत.मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी या प्रसंगाचा उलगडा केला आहे.एमसीएकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर २३ वर्षीय यशस्वी जैस्वालने महिन्याभरातच आपला निर्णय बदलला होता. हा निर्णय बदलण्यामागे रोहित शर्मा असल्याचे नाईक म्हणाले.रोहित शर्माने समजूत काढल्यानंतर यशस्वी जैस्वालने आपला निर्णय बदलला. मुंबई संघाने दिलेल्या संधीमुळेच यशस्वी जैस्वालचा भारतीय क्रिकेट संघात खेळण्याचा मार्ग मोकळा झाला होता.मुंबई मिररशी बोलताना अजिंक्य नाईक यांनी सांगितले की, ज्या मुंबई संघाने तुझे करिअर घडवले, त्या संघाबरोबरच तू राहा, असे रोहित शर्माने यशस्वीला सांगितले. मुंबईच्या संघाने आजवर ४२ वेळा रणजी करंडक जिंकलेला आहे, त्यामुळे या संघाकडून खेळणे हा अभिमान आणि प्रतिष्ठेचा विषय आहे. तसेच मुंबई क्रिकेटमुळेच त्याला भारतीय संघात खेळण्याची संधी मिळाली, विसरू नये. त्यामुळे त्याने या शहराचे आभार मानायला हवेत.याशिवाय यशस्वी जैस्वालने मुंबईतील काही वरिष्ठ खेळाडूंशी चर्चा केली आणि त्यानंतर ना हरकत प्रमाणपत्र माघारी घेतले, असेही अजिंक्य नाईक यांनी सांगितले. यशस्वी जैस्वालने ईमेलद्वारे ना हरकत प्रमाणपत्र माघारी घेण्याची विनंती केली, जी आम्ही मान्य केली, असेही नाईक म्हणाले. यशस्वी जैस्वाल हा मुळचा उत्तर प्रदेशचा आहे. क्रिकेटसाठी तो मुंबईत आला. २०१९ साली अतिशय लहान वयात त्याने मुंबई संघातून रणजी क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली. मुंबईसाठी त्याने सात प्रथम दर्जाचे सामने खेळले आहेत.भारतीय क्रिकेट संघाचा फलंदाज यशस्वी जैस्वाल हा मुंबई संघाकडून डोमेस्टिक क्रिकेट खेळत आला आहे. मात्र मध्यंतरी त्याने मुंबईचा संघ सोडून गोवा क्रिकेट संघाकडून क्रिकेट खेळण्याची इच्छा व्यक्त केली होती. यासाठी त्याने मुंबई क्रिकेट असोसिएशनकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळवले होते. मात्र कालांतराने त्याने आपला निर्णय बदलला.

### ईमेलद्वारे ना हरकत प्रमाणपत्र माघारी

या निर्णयामागे भारताच्या एकदिवसीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा असल्याचे आता समोर आले आहे.यशस्वी जैस्वालने ईमेलद्वारे ना हरकत प्रमाणपत्र माघारी घेण्याची विनंती केली, जी आम्ही मान्य केली, असेही नाईक म्हणाले.२०१९ साली अतिशय लहान वयात त्याने मुंबई संघातून रणजी क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली.

# सिराजबाबत खबरदारी गरजेची!

## बुमराप्रमाणे कार्यभार व्यवस्थापन आवश्यक; आरपी सिंहचे मत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघासाठी मोहम्मद सिराज आता जसप्रीत बुमराइतकाच महत्त्वाचा झाला असून त्याच्याही कार्यभार व्यवस्थापनाबाबत विचार झाला पाहिजे, असे मत माजी वेगवान गोलंदाज आरपी सिंह याने मांडले.**




नुकत्याच झालेल्या इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत ३१ वर्षीय सिराजने पाची कसोटी सामने खेळताना तब्बल १८५.३ षटके टाकली. यात त्याने २३ बळी मिळवत मालिकेतील सर्वात यशस्वी गोलंदाज ठरण्याचा मानही मिळवला. सिराजने निर्णायक पाचव्या कसोटीत एकूण नऊ बळी मिळवत भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिकाही बजावली. “सिराजला दुखापतमुक्त ठेवायचे झाल्यास कार्यभार व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे.

कमी कालावधीत बरेच सामने खेळल्यास वेगवान गोलंदाजांना दुखापतींचा धोका असतो. त्यामुळे बुमराप्रमाणेच सिराजबाबतही खबरदारी बाळगणे गरजेचे आहे,” असे आरपी याने सांगितले.बुमराने गेल्या दोन वर्षांत झालेल्या एकदिवसीय आणि ट्वेन्टी-२० विश्वचषकात उत्कृष्ट कामगिरी केली. योग्य कार्यभार व्यवस्थापनामुळेच हे शक्य झाले. आता सिराजही बुमराइतकाच महत्त्वाचा गोलंदाज झाला आहे. त्यामुळे त्यालाही अधूनमधून विश्रांती देणे आवश्यक आहे. त्याची योग्य काळजी घेणे गरजेचे आहे,” असेही आरपी म्हणाला.फलंदाजीप्रमाणेच गोलंदाजीतही भागीदारी महत्त्वाची असते. बुमराची गोलंदाजीची शैली (ॲक्शन) वेगळी असल्याने फलंदाज त्याच्याविरुद्ध अडचणीत सापडतात. तो अधिक बळी मिळवतो. दुसऱ्या बाजूने अचूक टप्पा राखून फलंदाजावर दडपण वाढविणे हे सिराजचे काम असते. तो आपली भूमिका चोख बजावतो.

### त्याची योग्य काळजी घेणे गरजेचे


त्यामुळेच या दोघांना यशस्वी कामगिरी करता येते. नुकत्याच झालेल्या इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत ३१ वर्षीय सिराजने पाची कसोटी सामने खेळताना तब्बल १८५.३ षटके टाकली. यात त्याने २३ बळी मिळवत मालिकेतील सर्वात यशस्वी गोलंदाज ठरण्याचा मानही मिळवला. सिराजने निर्णायक पाचव्या कसोटीत एकूण नऊ बळी मिळवत भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिकाही बजावली.

Pune District Education Association's
**Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy**
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

## एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम

# दासबोधाच्या हस्तलिखित ग्रंथनिर्मितीचा अनोखा उपक्रम!

## शिक्षण विश्व : व्ही.के. माटे हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांकडून ग्रंथराज दासबोधाचे लेखन

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज



**मोरया शिक्षण संस्थेच्या व्ही.के. माटे हायस्कूल, श्रीधर नगर, चिंचवड येथे २ ऑगस्ट २०२५ रोजी एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम राबवण्यात आला. समर्थ सेवा मंडळ सज्जनगड, श्रीमत ग्रंथराज दासबोध अध्ययन मंडळ, पिंपरी चिंचवड केंद्र आणि व्ही. के. माटे हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने, शालेय विद्यार्थ्यांकडून "श्रीमत दासबोध" या ग्रंथातील २०० समासांचे हस्तलिखित तयार करण्यात आले.**

या उपक्रमात इयत्ता आठवी ते दहावीच्या २०० विद्यार्थ्यांनी एकाच दिवशी, केवळ दोन तासांत, समासांचे अनुलेखन करून ऐतिहासिक स्वरूपाचा हस्तलिखित ग्रंथ तयार केला. ग्रंथाची जोडणी, बायंडिंग आणि आकर्षक मुखपृष्ठ तयार करून दासबोधाच्या या हस्तलिखित आवृत्तीचा प्रकाशन सोहळा ३ ऑगस्ट २०२५ रोजी श्रीधर नगर येथील श्री. घारे शास्त्री सभागृहात अत्यंत उत्साहात आणि श्रद्धेने पार पडला.

प्रकाशन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे होते – संतश्रेष्ठ श्री संत तुकाराम महाराज यांचे दहावे वंशज ह.भ.प. शिवाजी महाराज मोरे (देहू) आणि माननीय श्री. अजेयबुवा रामदासी (सज्जनगड). त्यांनी आपल्या भाषणातून संत परंपरेचे महत्त्व, दासबोधातील जीवनदृष्टी आणि विद्यार्थ्यांना मिळणारी मानसिक व बौद्धिक प्रेरणा यावर प्रकाश टाकला.

या उपक्रमामागे प्राचार्या सौ. इंद्रायणी माटे पिसोळकर आणि उपशिक्षिका सौ. प्रांजली कुलकर्णी यांची संकल्पना आणि मार्गदर्शन लाभले. "दिसा माजी काहीतरी ते लिहावे, प्रसंगी अखंडित वाचित जावे" या समर्थ रामदास स्वामींच्या उक्तीचा वास्तव अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला

कार्यक्रमास श्री. सुहासदादा क्षीरसागर (अध्यक्ष, श्रीमत दासबोध अध्ययन मंडळ, पिंपरी चिंचवड), सौ. अपर्णा कुलकर्णी (सहकेंद्र संचालक), मोरया संस्थेचे खजिनदार श्री. रणजीत सावंत, कार्यकारी सदस्य श्रीमती प्रतिभाताई कुलकर्णी, शालाधिपती कुमार प्रेम खरबड, कुमारी आदिती इगावे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये अध्यात्मिक, बौद्धिक आणि भाषिक जाणीव जागृत केली असून, समर्थ रामदास स्वामींचा विचार युवा पिढीपर्यंत पोहोचवण्याचा एक स्तुत्य प्रयत्न ठरला आहे.

> "श्रीरामदास स्वामींचे विचार आजच्या विद्यार्थ्यांना मानसिक व बौद्धिक सक्षमतेकडे नेतात आणि बल उपासनेसाठी प्रेरणा देतात. विद्यार्थ्यांनी फक्त अनुलेखनच केले नाही, तर त्याद्वारे समर्थांचा विचार मनाशी बांधून घेतला. दासबोधासारख्या ग्रंथाच्या अनुलेखनातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मिक प्रगल्भता निर्माण होते."
>
> **-मा. अजेयबुवा रामदासी,** सज्जनगड.



## एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम

# विकासाच्या नावाखाली विध्वंस!

## 23 वर्षांपूर्वी बांधलेल्या शाळेवर डीपी रोडचे आरक्षण

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने थेरगावसह शहरातील अनेक भागांमध्ये अघोरी व बिनधास्तपणे विकास आराखडा रेट्न लागू करण्याचा प्रयत्न सुरू केला असून, त्याविरोधात नागरिकांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला आहे. विशेषतः थेरगाव परिसरात जवळजवळ 70% भाग बाधित करणाऱ्या या आराखड्यामुळे रहिवाशांचे अस्तित्वच संकटात आले आहे.**



प्रशासनाने आखलेल्या या कथित विकास आराखड्यात 9 मीटर, 12 मीटर, 15 मीटर आणि तब्बल 24 मीटर रस्ते थेट 100% वस्तीच्या मधून टाकण्यात आले आहेत. या बिनधास्त नियोजनामुळे अनेक घरं, दुकाने, समाजिक संस्था आणि शैक्षणिक संस्थांचा अस्तित्वच धोक्यात आला आहे. थेरगावमधील नागरिक, पालक, विद्यार्थी आणि समाजिक कार्यकर्ते या अन्यायकारक आराखड्याविरोधात एकवटले असून, थेरगाव बहुउद्देशीय रहिवासी संघ या माध्यमातून संघटित संघर्षाची सुरुवात झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महापालिकेच्या या मनमानी विरोधात भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चाला थेरगावकरांचा प्रचंड पाठिंबा लाभला. मोर्चामध्ये मिलेनियम एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष विजय पवारयांच्यासह संघटनेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आणि तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या विरोध मोर्चात थेरगाव बहुउद्देशीय रहिवासी संघाचे कार्याध्यक्ष विजय पवार, अध्यक्ष अक्षय कांबळे, उपाध्यक्ष दीपक तरडे, सचिव नरेंद्र माने, खजिनदार प्रताप डुंबरे, सहसचिव आकाश पाटील, सहखजिनदार गणेश डोंगरे यांच्यासह कुणाल पवार, आकाश बारणे, संतोष पोकळे, हरीश पाठक, संजय ठाकरे, यशवंत माने, विजय माने, रुपेश गोरे, नाथाजी खंडागळे, निखिल साखळी, सूरज भंडारी, नंदाताई काकडे, मनीषाताई सुतार, माधुरीताई हिवाळे आणि असंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळा उद्ध्वस्त होणार का? मिलेनियम एज्युकेशन संस्थेने थेरगावमध्ये 2002 पासून अल्प फीमध्ये उच्च दर्जाचं शिक्षण देणारी शाळा उभी केली — न्यू इंग्लिश मिडियम स्कूल — जी आज 1 हजार 200 विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहे, ती शाळा प्रशासनाच्या नव्या आराखड्यात 24 मीटर रोडमध्ये येते, हे अत्यंत धक्कादायक आहे.

शहरात सर्वसामान्यांसाठी शिक्षणाचं उज्वल उदाहरण ठरलेली ही शाळा उद्ध्वस्त होणार का?

> "जिथं घरटी उभी आहेत, तिथं महामार्ग आखणं हे विकास नव्हे – हा अन्याय आहे. मी 23 वर्षांपासून थेरगावमध्ये शिक्षणाचा दिवा तेवत आहे – पण प्रशासनाचा आराखडा तो विझवण्याचा कट आहे. गोरगरिबांची, मध्यमवर्गीयांची शिक्षणसंस्था तुम्ही 24 मीटर रस्त्याखाली टाकणार? हा विकास नाही, हे सामाजिक अंधत्व आहे."
>
> – **विजय पवार,**
> अध्यक्ष, मिलेनियम एज्युकेशन संस्था.

असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. महापालिका प्रशासनाने डोळस आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन न ठेवता, संपूर्णपणे जमीन मालक, रहिवासी, समाजिक संस्था, शाळा, मंदिरे, स्मशानभूमी यांना न विचारता आणि कोणतीही पारदर्शक प्रक्रिया न राबवता हा आराखडा तयार केल्याने लोकांमध्ये आक्रोश आहे. थेरगावकरांचा इशारा स्पष्ट आहे "हा आराखडा रद्द करा, अन्यथा तीव्र जनआंदोलनाला सामोरे जा!".

# राख्यांमध्ये देशप्रेम-राष्ट्रभक्तीचा सुगंध!

## शिक्षण विश्व: व्ही. के. माटे हायस्कूलकडून सीमावरील जवानांना सलाम!

। पिंपरी-चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा (इयत्ता आठवी) अंतिम निकाल आणि शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीचा एकूण निकाल २२.०६ टक्के लागला आहे.**



रक्षाबंधन आणि स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर व्ही. के. माटे हायस्कूल, मोरया शिक्षण संस्था यांच्या वतीने एक आगळावेगळा उपक्रम राबवण्यात आला.

शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या छोट्याशा हातांनी प्रेमाने बनवलेल्या राख्या थेट सीमावरील जवानांना पाठवण्यात आल्या, ज्या सैनिकांसाठी देशरक्षण हेच जीवनधर्म आहे.

या उपक्रमामागील उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शौर्य, पराक्रम, जिद्द आणि त्यागाचे संस्कार रुजवणे. सैनिक जसे प्रत्येक संकटात आपल्या देशवासियांच्या रक्षणासाठी पुढे सरसावतात, त्याच भावनेने विद्यार्थ्यांनी आपल्या 'राखीभाऊं'साठी या प्रेमाच्या राख्या साकारल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. हनुमंत हुचगोळ यांनी केले, तर संपूर्ण आयोजन शिक्षक समन्वयक श्री. संजय खेडकर यांनी कुशलतेने पार पाडले. मोरया शिक्षण संस्थेच्या कार्यवाह, तहयात विश्वस्त व प्राचार्य सौ. इंद्रायणी माटे पिसोळकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सैनिकांच्या त्यागाची जाणीव करून देत देशप्रेमाच्या कथा सांगून प्रेरणा दिली.

कार्यक्रमास उपमुख्याध्यापक श्री. दिलीप कुमावत, पर्यवेक्षिका सौ. मैत्रेयी राजे, सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.

DYP
DR. D. Y. PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

# Dr D Y Patil Educational Complex, Akurdi, Pune

*Approved by AICTE, DTE, MSBTE & Govt. of Maharashtra,*
*Accredited by NBA & Grade Status by NAAC, Affiliated to Savitribai Phule Pune University*

**ADMISSIONS OPEN 2025-26**

41 YEARS Academic Excellence

## Experience D Y Patil Educational Complex



- **15k+** Students Placed
- **52 LPA** Highest Package
- **50,000+** Alumni
- **1000+** Empanelled Recruiters
- **150+** University Toppers

## Our Institutes

### D Y Patil College of Engineering (Autonomous)
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Accredited by NAAC with 'A' Grade & NBA
*UG – Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A*
*PG – Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A*
*PhD – Mech / E&TC / Civil*

### D Y Patil Institute of MCA & Management
Accredited by NAAC with 'A' Grade & Affiliated to SPPU
*MCA / MBA / PhD (Management)*

### Dr D Y Patil College of Architecture
Accredited by NAAC with 'A' Grade & Approved by COA
*B Arch / M Arch (Construction Management) / D Arch*

### D Y Patil PGDM Institute, Akurdi, Pune
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
*Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management*

### Dr D Y Patil College of Agriculture Business Management
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
*BSc (Hons) Agri Business Management*

### Dr D Y Patil College of Pharmacy
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
Accredited by NBA & NAAC with 'A+' GRADE
*D Pharm / B Pharm / Pharm D / M Pharm (Phcol) / M Pharm (Pharmaceutics) / M Pharm (DRA) / M Pharm (PQA) / M Pharm (Pchem) / M Pharm (PP) / PhD*

### Dr D Y Patil Institute of Pharmacy
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
*D Pharm*

### Y B Patil Polytechnic
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
*Diploma in Civil / Mech / Comp / E&C (Accredited by NBA)*

## Campus at a Glance

- Beautifully landscaped lush green campus
- Virtual Lab Nodal Centre of IIT Bombay
- Digital Classrooms & Libraries
- Online Teaching Learning Platforms
- Highly Qualified & Experienced Faculty
- Outstanding academic results
- Collaboration with International Universities
- Wi-Fi enabled campus / ERP Enabled Administration
- Extravagant Cafeterias & Sports Complex
- Ultra-modern Auditoriums, Seminar Halls
- Conducive & disciplined environment
- Incubation & Startup ecosystem
- State-of-the-Art Hostel for Girls & Boys

## Corporate Relations & Placement Cell

- Strong Alumni engagement
- Internship Opportunities in Industry
- Industry-Centric Training Programs
- International Placement Opportunities
- Notable Placement Record
- Employability Assessment Test conducted by SHL for students (First year to Final Year)
- Corporate Tie-ups & Partnerships with industry for student enrichment activities
- Participation of students in Hackathons & competitions organized by Industries
- Thrust on Personality Development, Soft Skills & Communication Skills in English in Language Laboratories

## Collaborations with Industry (MOU's & COE's)

Jendamark | wipro | NTT Data | virtusa | B&R | Emcure | Knorr-Bremse | NuLife | Evolving X | CitiusTech | SHL | McKinley Rice | bvc | Technouniq | RPG | Constrologix | NASSCOM Foundation | Indovance | Tech Mahindra | DataTech Labs | Emerson | newgen

SECTOR NO. 29, NIGDI PRADHIKARAN, AKURDI, PUNE 411044, MAHARASHTRA, INDIA
www.dypakurdipune.edu.in | admission@dypakurdipune.edu.in | @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE

DESIGNED BY SHIVPRASAD S PATIL

**"Discover, Learn, Lead—The D Y Patil Way."**